MHST050004382023

<u>३रे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कऱ्हाड, जि. सातारा यांचे न्यायालयात.</u>
(श्री. किरण रा. खोंद्रे यांचे समोर)

<u>किरकोळ दिवाणी (वारस)अर्ज क्र.६६/२०२३.</u>

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. सुशिला ता. कचरे. | <u>अर्जदार.</u> |
| | विरुध्द | |
| १. | सौ. शारदा ज. देसाई, वगैरे. | <u>जाबदार.</u> |

<u>अर्जदारतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६, नियम १७ अन्वये नि.८० वर दाखल दुरुस्ती अर्जावर आदेश.</u>

**(०१).** अर्जदार यांचे कथन असे आहे की, मुळ अर्ज हा वारस दाखला मिळणेसाठी दाखल केला असून, प्रस्तुत अर्जान्वये अर्जदार मुळ अर्जातील कलम ४ मध्ये नमुद रकमांबाबतचा दुरुस्ती तपशील समाविष्ठ करणेबाबत विनंती करत आहेत. वास्तविक पहाता, जाबदार यांना वकीलांमार्फत नोटीसा दिल्या असून, रकमांबाबतचा तपशीलाची मागणी केली होती. जमा असलेल्या रकमा या अंदाजे स्वरुपात नमुद केल्या आहेत. परंतू नोटीसा मिळाल्यानंतरही काही जाबदार यांनी रकमांचा तपशील दिलेला नाही, काही जाबदार यांनी रकमा अपरोक्ष काढून घेतल्या आहेत. त्यामुळे अर्जदार यांचेकडे निश्चितपणे किती रकमा जमा आहे व किती रकमा काढून नेल्या आहेत, याबाबतच तपशील न्यायालयासमोर येणे आवश्यक व जरुरीचे आहे. सदरची दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची आहे. तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांनी दुरुस्तीची मागणी केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज.

**(०२).** जाबदार यांनी प्रस्तुत दुरुस्ती अर्जावर म्हणणे देवून, अर्ज व त्यामधील कथने नाकारली आहेत. जाबदार यांनी असे कथन केले

आहे की, अर्ज दाखल करणेपूर्वी अर्जदार यांनी सर्व बँक अथवा वित्तीय संस्था यांचेकडून योग्य तो रकमांचा तपशील घेणे गरजेचे होते. अंदाजे माहीती घेवून अर्ज दाखल करणे चुकीचे आहे. दुरुस्ती अर्जात नमुद केलेल्या रकमा या चुकीच्या आहेत. नमुद रकमांचा तपशील हा अस्तित्वात नाही, त्यामुळे अस्तित्वात नसलेल्या रकमांची मागणी करता येणार नाही. सबब, प्रस्तुत दुरुस्ती अर्ज रद्द करण्याची विनंती जाबदार यांनी केली आहे.

**(०३).** दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद, अर्जातील कथने, जाबदार यांचे म्हणणे आणि इतर कागदपत्रे विचारात घेता, प्रस्तुत अर्जाचा निर्णय करणेहेतू माझ्यासमोर खालील वादप्रश्न उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष आणि कारणमिमांसा खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तुत दुरुस्तीमुळे अर्जाचे मुळ स्वरुप बदलते काय ? | नाही. |
| ०२. | उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | होय. |
| ०३. | अर्जाची गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | होय. |
| ०४. | काय आदेश ? | अर्ज मंजुर करणेत आला. |

## का र ण मि मां सा

### वादप्रश्न क्र.०१ बाबतः

**(०४).** कबुल तथ्यानुसार अर्जदार यांनी मुळ अर्ज हा वारस दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे कथन असे आहे की, मुळ अर्जातील कलम ०४ मध्ये नमुद रकमांबाबतचा दुरुस्ती तपशील समाविष्ठ करणेबाबत विनंती करत आहेत. वास्तविक पहाता, जाबदार यांना वकीलांमार्फत नोटीसा दिल्या असून, रकमांबाबतचा तपशीलाची मागणी केली होती. जमा

असलेल्या रकमा या अंदाजे स्वरुपात नमुद केल्या आहेत. परंतु नोटीसा मिळाल्या नंतरही काही जाबदार यांनी रक्कमांचा तपशील दिलेला नाही, काही जाबदार यांनी रकमा अपरोक्ष काढून घेतल्या आहेत. त्यामुळे अर्जदार यांचेकडे निश्चितपणे किती रकमा जमा आहे व किती रकमा काढून नेल्या आहेत, याबाबतचा तपशील न्यायालया समोर येणे आवश्यक व जरुरीचे आहे. या उलट जाबदार यांचे कथन असे आहे की, अर्जदार यांनी अर्ज दाखल करतेवेळीच सर्व बँक अथवा वित्तीय संस्था यांचेकडून योग्य तो रकमांचा तपशील घेणे गरजेचे होते. अंदाजे माहीती घेवून अर्ज दाखल करणे चुकीचे आहे. दुरुस्ती अर्जात नमुद केलेल्या रकमा या चुकीच्या आहेत. नमुद रकमांचा तपशील हा अस्तित्वात नाही, त्यामुळे अस्तित्वात नसलेल्या रकमांची मागणी करता येणार नाही.

**(०५).** कबुल तथ्यानुसार अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज 'भारतीय वारस अधिनियम १९२५ चे कलम ३७२' नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे करिता दाखल केला आहे. मुळ अर्ज पाहिला असता त्यातील परिच्छेद क्रमांक ०४ मध्ये मयत पांडुरंग कृष्णाजी पाटील यांचे नावे विविध बँकामध्ये जमा असलेल्या रोख रक्कमा, मुदतठेवी इत्यादी यांचे आकडे अंदाजे नमुद केले आहेत असे दिसुन येते. कबुल तथ्यानुसार 'भारतीय वारस अधिनियम १९२५ चे कलम ३७२' नुसार दिले जाणारे प्रमाणपत्र हे ठोस अशा रक्कमांकरिताच दिले जाऊ शकते ही वस्तुस्थिती आहे. अर्जदार मागत असलेली दुरूस्ती ही केवळ तांत्रीक स्वरुपाची आहे व ती मान्य केल्याने अर्जाचे स्वरुप नक्कीच बदलत नाही. त्यामुळे मी वादप्रश्न क्रमांक ०१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>वादप्रश्न क्र.०२ व ०३ बाबत.</u>

**(०६).** सदरील वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणे करिता आणि विस्तार भयास्तव एकत्रीत विचारात घेतले आहेत. कबुल तथ्यानुसार अर्जदार करू इच्छीत असलेली प्रस्तावित दुरूस्ती ही केवळ तांत्रीक स्वरूपाची अशी आहे. सबब, जर हा अर्ज मंजुर झाला नाही तर याच

अर्जदार यांना जाबदारचे विरूध्द नव्याने स्वतंत्र अर्ज दाखल करावा लागणार आहे. त्यायोगे होवु घातलेली भविष्यातील गुंतागुंत वाढणार आहे. सबब, उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी, तसेच खटल्यांची गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे असे माझे मत आहे. अर्जदारने ही दुरूस्ती आणणेकरिता सुमारे ०३ वर्षाचा उशीर केला आहे. सदरची वस्तुस्थिती विचारात घेता सदर दुरूस्तीमुळे जाबदार यांना होणारा संभाव्य त्रास हा द्रव्यदंडाच्या स्वरूपात भरून दिला जावु शकतो. तसेच त्यांना त्यांची अधिकचे म्हणने दाखल करणेची देखील संधी असणार आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक ०२ व ०३ होकारार्थी उत्तरी करून वादप्रश्न क्रमांक ०४ च्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

**आदेश.**

| | |
|---|---|
| (०१) | अर्ज रक्कम ₹.५००/- (रुपये पाचशे मात्र) च्या द्रव्यदंडावर मंजुर करणेत आला. |
| (०२) | द्रव्यदंड जाबदार यांना दिले शिवाय अर्जदार यांना अर्जात दुरूस्ती करता येणार नाही. |
| (०३) | पुढील नेमले तारखेपर्यंत अर्जदारने मुळ अर्जात दुरूस्ती करून तशा दुरूस्त अर्जाची प्रत याकामी दाखल करावी. |

KIRAN RAJARAM KHONDRE
Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2026.03.07 17:04:01 +0530

कऱ्हाड. ( किरण खोंद्रे )
दि.०७/०३/२०२६ ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,कऱ्हाड.